महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीटीई -३६१९/ प्र. क्र.१११/ पोल-३, दि. २७/०३/२०२६

**विषय:-** पोलीस आयुक्त, पिंपरी चिचंवड यांच्या आस्थापनेवरील पहिल्या, व दुस-या व तिस-या टप्प्यात निर्माण झालेल्या एकूण २६३३ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीटीई -३६१९/ प्र. क्र.१११/ पोल-३, दि. २७/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२७१८४४३६७५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 02-04-2026 17:19:55

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, का क्र.२६-ब

प्रत :-

पोलीस आयुक्त, पिंपरी चिचंवड
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (पुर्नरचना) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२ पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवरील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात निर्माण झालेल्या एकूण २६३३ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीटीई ३६१९/प्र.क्र.१११/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, गृह विभाग क्र.अेपीओ-०८१६/प्र.क्र.१०३/पोल-३, दि.२८.०५.२०१८.
२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३६१९/प्र.क्र.१११/पोल-३., दि.२४.०९.२०२५
३) पोलीस महानिरीक्षक (नि.व स.),पोलीस महासंचालक कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/पो.आ.पिंपरी-चिंचवड/५१/२०१९, दि.०६.०२.२०२६.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६.

शासन निर्णय :-

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दि.२८.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन पिंपरी चिंचवड शहर व परिसराकरीता स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. या शासन निर्णयानुसार पोलीस आयुक्त,पिपंरी-चिंचवड यांचे आस्थापनेवर तीन टप्प्यात एकूण २६३३ पदे (पहिल्या टप्प्यात-६०% म्हणजे १५६८, दुसऱ्या टप्प्यात-२०% म्हणजे ५५२ व तिसऱ्या टप्प्यात २०% म्हणजे ५१३ पदे) निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. त्यानुसार **पहिल्या** टप्प्यात निर्माण केलल्या विविध संवर्गातील १५६८ पदांना यापूर्वी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. यापूर्वी २६३३ पदांना संदर्भीय क्र.२ येथील दि.२४.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

३. आता, पोलीस महानिरीक्षक (नि.व स.) पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील दि.०६.०२.२०२६ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांचे आस्थापनेवर पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात नव्याने निर्माण करण्यात आलेल्या खालील तक्त्यात नमूद केलेल्या एकूण २६३३ अस्थायी पदांना दि.०१/०३/२०२६ पासून मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

**अ) पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी पहिल्या टप्प्यामधील निर्माण करण्यात आलेली १५६८ पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | कार्यकारी पदे | पदसंख्या | अकार्यकारी पदे | पदसंख्या | दवाखान्याकरिता पदे | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त | १ | प्रशासकीय अधिकारी | १ | वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ फिजीशियन | १ |
| २ | अपर पोलीस आयुक्त | १ | कार्यालय अधीक्षक | १ | वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ एमबीबीएस | १ |
| ३ | पोलीस उप आयुक्त | २ | स्वीय सहायक | १ | वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ स्त्रीरोग तज्ञ | १ |
| ४ | सहायक पोलीस आयुक्त | ७ | कनिष्ठ श्रेणी लघुलेखक | १ | परिचारीका | ४ |
| ५ | पोलीस निरीक्षक | २४ | लेखा अधिकारी | १ | मिश्रक | १ |
| ६ | सहायक पोलीस निरीक्षक | ३६ | सहायक लेखा अधिकारी | १ | औषध निर्माण अधिकारी | १ |
| ७ | पोलीस उपनिरीक्षक | ६५ | विधी अधिकारी | २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (वैज्ञानिक सहायक) | १ |
| ८ | सहायक पोलीस उपनिरीक्षक | ८८ | प्रमुख लिपीक | ४ | वैज्ञानिक सहायक | १ |
| ९ | पोलीस हवालदार | १७४ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | ९ | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ |
| १० | पोलीस नाईक | ३३६ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २० | ड्रेसर | १ |
| ११ | पोलीस शिपाई | ७४४ | फोटोग्राफर | | वॉर्ड बॉय | ०२ |
| १२ | | | फिंगर प्रिंट एक्स्पर्ट | १ | आया | १ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | | | मोची | १ | चपराशी | १ |
| १४ | | | हेडकुक | १ | सफाईगार | २ |
| १५ | | | सहायक हेड कुक | २ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | १ |
| १६ | | | मेस सर्व्हंट | ३ | | |
| १७ | | | माळी | १ | | |
| १८ | | | शिंपी | १ | | |
| १९ | | | न्हावी | १ | | |
| २० | | | कार्यालयीन शिपाई | ६ | | |
| २१ | | | सफाईगार | १२ | | |
| एकूण | १४७८ | | ७० | | २० | |

**ब) <u>पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी दुसऱ्या टप्प्यामधील निर्माण करण्यात आलेली ५५२ पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.</u>**

| अ.क्र | कार्यकारी पदे | पदसंख्या | अ.क्र. | अकार्यकारी पदे | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ७ | १ | वैदयकीय अधिकारी वर्ग १ एमबीबीएस | १ |
| २ | सहायक पोलीस निरीक्षक | १४ | २ | परिचारिका | १ |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक | २९ | ३ | औषध निर्माण अधिकारी | १ |
| ४ | सहायक पोलीस उपनिरीक्षक | ३२ | ४ | ड्रेसर | १ |
| ५ | पोलीस हवालदार | ६१ | ५ | वॉर्ड बॉय | १ |
| ६ | पोलीस नाईक | ११४ | ६ | आया | १ |
| ७ | पोलीस शिपाई | २५९ | ७ | चपराशी | १ |
| **एकूण-अ** | | **५१६** | ८ | सफाईगार | १ |
| ८ | कार्यालय अधीक्षक | १ | **एकूण-क** | | ८ |
| ९ | कनिष्ठ श्रेणी लघुलेखक | १ | | | |
| १० | विधी अधिकारी | १ | | | |
| ११ | प्रमुख लिपिक | १ | | | |
| १२ | वरिष्ठ श्रेणी लिपिक | ३ | | | |
| १३ | कनिष्ठ श्रेणी लिपिक | ६ | | | |
| १४ | फिंगर प्रिंट एक्स्पर्ट | १ | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | मोची | १ | | |
| १६ | हेडकुक | १ | | |
| १७ | सहायक हेड कुक | १ | | |
| १८ | मेस सर्व्हंट | २ | | |
| १९ | माळी | १ | | |
| २० | शिंपी | १ | | |
| २१ | न्हावी | १ | | |
| २२ | कार्यालयीन शिपाई | २ | | |
| २३ | सफाईगार | ४ | | |
| **एकूण-ब** | | **२८** | | |
| **एकूण अ+ब** | | **५४४** | **एकूण अ+ब+क** | **५५२** |

**क) <u>पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी तिसऱ्या टप्प्यामधील निर्माण करण्यात आलेली ५१३ पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.</u>**

| **अ.क्र** | **कार्यकारी पदे** | **पदसंख्या** | **अ.क्र.** | **पोलीस दवाखान्याकरीता** | **पदसंख्या** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ५ | १ | परिचारिका | १ |
| २ | सहायक पोलीस निरीक्षक | ८ | २ | वॉर्ड बॉय | १ |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक | २६ | ३ | सफाईगार | १ |
| ४ | सहायक पोलीस उपनिरीक्षक | ३१ | **एकूण-क** | | **३** |
| ५ | पोलीस हवालदार | ५५ | | | |
| ६ | पोलीस नाईक | ११२ | | | |
| ७ | पोलीस शिपाई | २५२ | | | |
| **एकूण-अ** | | **४८९** | | | |
| ८ | निम्न श्रेणी लघुलेखक | १ | | | |
| ९ | विधी अधिकारी | १ | | | |
| १० | प्रमुख लिपिक | १ | | | |
| ११ | वरिष्ठ श्रेणी लिपिक | ३ | | | |
| १२ | कनिष्ठ श्रेणी लिपिक | ६ | | | |
| १३ | सहायक हेड कुक | १ | | | |
| १४ | मेस सर्व्हंट | २ | | | |
| १५ | कार्यालयीन शिपाई | २ | | | |
| १६ | सफाईगार | ४ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **एकूण-ब** | **२१** | | |
| **एकूण अ+ब** | **५१०** | **एकूण अ+ब+क** | **५१३** |

२. म्हणून, आता पोलीस आयुक्त,पिंपरी-चिंचवड यांच्या आस्थापनेवरील उपरोक्त तक्ता (अ,ब व क ) मध्ये नमूद केलेल्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या तप्प्यात निर्माण झालेल्या (१५६८+५५२+५१३) एकूण २६३३ अस्थायी पदांना **दिनांक १ मार्च, २०२६ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६** पर्यंत खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

३. यासाठी होणारा खर्च हा गृह विभाग, मागणी क्रमांक “बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०२) जिल्हा हॉस्पीटल (२०५५०१७७), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ११० ग्राम पोलीस (००) (०१) पोलीस पाटील व मेवास पोलीस (२०५५०२२१), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन (००) (४१) गुप्तसेवा खर्च (२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन (००) (०२) पोलीसांची भरती (२०५५०६६९), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०५) कोंडवाडे (२०५५०२२१) ” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि तो **सन २०२६-२७** या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दिनांक २८.०२.२०२६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२७१८४४३६७५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.27 18:45:28 +05'30'

**( रा.ता.भालवणे )**

**उप सचिव, गृह विभाग**

प्रत,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.

४) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई .

५) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.

६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

७) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.

८) जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.

९) वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१.

१०) निवड नस्ती.